| MHGO040012222025 | DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते | पी.डब्ल्यु.डी.व्ही अर्ज क्र. ३१/२०२५ मधील नि. क्र. १२ वरील आदेश. **अरुणा वि. गजानन व इतर.** |
|---|---|---|

विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०९.०७.२०२५ रोजी कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ नुसार गैरअर्जदार याच्याकडून उदरनिर्वाहासाठी अंतरिम आर्थिक मदतीसाठी दाखल केलेला आहे. गैरअर्जदाराने **नि. क्र. ०६** लगत दिनांक १४.११.२०२५ रोजी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

२. या अर्जाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे निश्चित केले. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार मागणी करतात, त्याप्रमाणे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कलम २२ अन्वये अंतरिम अर्थसाहाय्य मिळण्यास पात्र आहेत काय? | **...अंशतः होकारार्थी.** |
| **२.** | काय आदेश ? | **...अंतीम आदेशाप्रमाणे.** |

**—: कारणमीमांसा :—**

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत :—**

३. मुद्दा क्र. १ च्या निर्णयासाठी, दाखल अर्ज व त्यावरील म्हणण्याचे सविस्तर वाचन केले. अर्जातील नमूद कथनांचे अवलोकन केले असता, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे वैवाहिक संबंधाबाबत त्यांच्यात कोणताही वाद नाही. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांच्या घरी नांदावयास गेल्यानंतर तिच्यासोबत कौटुंबिक हिंसाचाराचा जो काही प्रकार घडला, त्याबाबत तिने तिच्या अर्जात सविस्तर नमुद केलेले आहे.

४. तिने तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे नमूद करुन, गैरअर्जदार क्र. १ हा मजूरी करत असून, रू. २०,०००/— दरमहा कमवित

असल्याचे नमूद केलेले आहे. अर्जदार हिने तिचेसाठी रू. १०,०००/— अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे.

५. अभिलेखावरुन अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्नसंबंध आजही कायम असल्याबाबत व अर्जदार हे विभक्त राहत असल्याबाबत देखील आज मितीला कोणताही वाद दिसून येत नाही.

६. दोन्ही वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे सविस्तर वाचले. अर्जातील नमूद कथने व जबाबातील नमूद कथनांवरुन अर्जदार हिच्यावर अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रथमदर्शी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र. १ याने जरी अर्जातील आरोप नाकारलेले असले, तरी आज रोजी देखील अर्जदार हया गैरअर्जदारांपासून १० वर्षापासून विभक्त राहत आहेत. तसेच तिचे उदरनिर्वाहाबाबत गैरअर्जदाराने काही रक्कम तिला दिली, याबाबत कोणतीही बाब न्यायालयासमोर आली नाही.

७. गैरअर्जदाराचे कथनाप्रमाणे व त्यावरील असलेल्या जबाबदा—या व कर्ज याबाबत संपूर्ण बाबी पुराव्यानंतर न्यायालयासमोर येणारच आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचे उत्पन्नाबाबत एकमेकांवर आरोप—प्रत्यारोप केलेला आहे, मात्र त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रस्तुत अर्ज हा अंतरिम पोटगीसाठी आहे. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. त्यामुळे तिला उदरनिर्वाहासाठी रकमेची आवश्यकता आहे.

८. गैरअर्जदाराने देखील ती वेगळी राहत असल्यापासून तिचे उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नसल्याची बाब दिसून येते. याउलट, गैरअर्जदार यांनी त्यांचे जबाबामध्ये असे कथन केले की, त्याला पक्षघात /लखवाचा आजार झाला आहे. त्यामुळे त्याचे ५४ टक्के शरीर दिव्यांग झालेला आहे व तो कोणताही कार्य करण्यास असमर्थ आहे. त्याकरिता गैरअर्जदार क्र. १ याने वैद्यकिय प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल

केला आहे. तसेच अर्जदार ही दरदिवस १,०००/— रुपये कमविते व स्वत:चे पालन पोषण करण्यास समक्ष आहे असे गैरअर्जदराने कथन केले आहे. मात्र त्याबाबत कोणताही पुरावा गैरअर्जदारांच्या वतीने न्यायालयासमोर दाखल केला नाही. त्याबाबत आज तरी अर्जदार यांस कोणतेही उत्पन्न नसल्याचे गृहीत धरून, अर्जदाराला दरमहा ५००/— रू अंतरिम पोटगीची रक्कम देण्याचे आदेशित करणे योग्य व न्यायोचित होईल, असे माझे स्पषट मत आहे. म्हणून गैरअर्जदार क्र. १ याने उपरोक्त विवेचन केल्याप्रमाणे अर्जदार यांस पोटगी देण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आ दे श** ::

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला दरमहा रू. ५००/— (पाच शे फक्त) अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम आर्थिक मदत पुढील आदेशापर्यंत द्यावी.

३. आदेशाची प्रत कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५ कलम २४ नुसार पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

JOSHI ATUL RATNAKAR

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.03.11 18:10:07 +0530

(ए. आर. जोशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
आमगांव.

दिनांक: ११.०३.२०२६.